साप्ताहिक
"एकच ध्येय... एकच आवाज"
PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक १३ वा | सोमवार, दि. १३/०४/२०२६ ते दि. १९/०४/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## क्रांतिवीर खाज्या नाईक स्मृतीस्थळाला 'क वर्ग' पर्यटन दर्जासाठी प्रयत्न करणार-आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके

धुळे (जिमाका) – धुळे जिल्ह्यातील क्रांतिवीर खाज्या नाईक यांच्या स्मृतीस्थळाला 'क वर्ग' पर्यटन स्थळाचा दर्जा मिळवून देण्यासाठी शंभर टक्के प्रयत्न करणार असल्यांची ग्वाही राज्याचे आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ. अशोक उईके यांनी दिली.

देवगिरी कल्याण आश्रम,धुळे व आदिवासी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने शिरपूर तालुक्यातील बाटवापाडा (शेमल्या) येथे क्रांतिवीर खाज्या नाईक यांच्या शौर्य स्मृतीदिनानिमित्त पारंपारिक वाद्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आदिवासी विकास मंत्री डॉ. उईके बोलत होते. या कार्यक्रमास आमदार काशीराम पावरा, आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त दिनकर पावरा, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, प्रकल्प अधिकारी (यावल) अरुण पवार.जिल्हा जात पडताळणी कार्यालयाचे संशोधन अधिकारी निलेश राठोड,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तुषार रंधे, आदी उपस्थित होते.

आदिवासी विकास मंत्री डॉ. उईके म्हणाले क्रांतिवीर खाजा नाईक यांचे कार्य आणि बलिदान अत्यंत प्रेरणादायी असून क्रांतिवीर खाज्या नाईक यांच्या स्मृतीस्थळाला 'क वर्ग' पर्यटन स्थळाचा दर्जा मिळवून देण्यासाठी १०० टक्के प्रयत्न करण्यात येईल, तसेच दरवर्षी ११ एप्रिल रोजी आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून शौर्य दिन साजरा करण्यात येईल.आदिवासी विकास विभागाच्या राणी दुर्गावती सबलीकरण योजनेच्या माध्यमातून महिलांना उमेद व माविमच्या धर्तीवर महिला बचत गट निर्माण करण्यात येणार आहे. आदिवासी विकास विभागामार्फत जनजाती समाजाच्या इतिहासात इतिहास जिवंत ठेवण्यासाठी आदिवासी क्रांतिकारांचे पुस्तक बोलीभाषा मातृभाषाचे संवर्धन करण्यात येईल.

आदिवासी जनजातींना लाभ देण्यासाठी प्रकल्प अधिकारी यांनी आठवड्यातून दोन दिवस साक्री व शिरपूर येथे दुर्गमभागातील नागरिकांना विविध योजनेचा लाभ देण्यासाठी मेळावे, कार्यशाळा, संवाद सत्र आयोजित करावे. आदिवासी विभागाच्या माध्यमातून मोठया प्रमाणात महिला बचत गट निर्माण करावे. शिरपूर तालुक्यातील हजारो महिला बचतगट निर्माण करुन निधी मंजूर करुन देऊ. आदिवासी समाजातील युवकांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी लघु व सुक्ष्म उद्योग निर्माण करण्यासाठी रोजगार मेळाव्यांचे आयोजन करावे. शासकीय व अनुदानीत आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्यासाठी सन २०२६-२७ वर्षांत दोन महिन्यांत पात्रताधारक शिक्षकांची पदे भरण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. त्याचप्रमाणे आदिवासी संस्कृतीचे दर्शन, गौरवशाली इतिहास, देव, दैवत, कुलदैवत, अस्मिता जिवंत राहण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहन ही त्यांनी यावेळी केले.

आमदार काशीराम पावरा यांनी क्रांतिवीर खाजा नाईक यांच्या ब्रिटिशांविरुद्धच्या लढ्याचे स्मरण करून त्यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. स्मृतीस्थळाचा सर्वांगीण विकास, सुशोभीकरण, रस्ते व इतर पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची तसेच शौर्य दिन शासनस्तरावर साजरा करण्याची मागणी त्यांनी आदिवासी विकास मंत्री डॉ.उईके यांच्याकडे केली.

कार्यक्रमात पारंपारिक ढोल-ताशांच्या गजरात मंत्र्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच डॉ. उईके यांनी स्मृतीस्थळाला भेट देऊन परिसराची पाहणी केली व वाद्य स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्रांचे वितरण केले. या कार्यक्रमास स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी व विविध विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी शेतकरी व नागरिकांशी साधला संवाद

संवादाच्या माध्यमातून जाणून घेतल्या अडीअडचणी – राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी आज शेतकरी व स्थानिक नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधत त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. बोराडी येथील के.व्ही.टी.आर आयुवेंद महाविद्यालयात या संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमांस आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त दिनकर पावरा, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, प्रकल्प अधिकारी (यावल) अरुण पवार.जिल्हा जात पडताळणी कार्यालयाचे संशोधन अधिकारी निलेश राठोड,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तुषार रंधे, सरपंच सुकदेव मालचे, उपसंरपच राहुल रंधे तसेच मोठया प्रमाणात शेतकरी व नागरीक, विद्यार्थी उपस्थित होते.

आदिवासी विकास मंत्री डॉ. उईके यांनी प्रत्येकाची समस्या संयमाने ऐकून घेत त्यांना सकारात्मक उत्तरे दिली. यात आदिवासीचे वनपट्टेधारकांना मालकी हक्क मिळवून देण्यासाठी स्वतंत्र सातबारे मिळण्यासाठी जिल्हास्तरावर बैठकीचे आयोजन करावे. आदिवासी जनजातींना बिरसा मुंडा कृषी क्रांन्ती योजनेतंर्गत विहीर, सोलरपंप, सिंचन व्यवस्था, बी.बियाणे उपलब्ध करुन द्यावे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यात यांवा. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम वेळेत वितरीत करावी. पंडीत दिनदयाल उपाध्याय योजनांचा लाभ देण्यात यावा. आदिवासी विकास विभागातील नामांकित इंग्रजी शाळेचे त्रयस्त संस्थेमार्फत ऑडीट करावे. आदिवासी विकास विभागातील शाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्यासाठी शिक्षकांची नियुक्ती, पेसा क्षेत्रातील नोकर भरती, मानधन तत्वावरील शिक्षकांना नियमित करणे, अतिक्रमण धारकांचे घरे नियमाकुलीन करणे, क्रान्तीवीर राघोजी भांगरे गुणवंत पुरस्काराची रक्कम त्वरीत देण्यात बाबत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी शासन कटिबद्ध असून प्रलंबित प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रांरभी, डॉ.उईके यांनी लिलाई हॉस्पिटला भेट देवून तेथील रुग्णांशी संवाद साधला. यावेळी उपस्थित शेतकरी, नागरिकांनीही आपल्या समस्या थेट मांडण्यासाठी मिळालेल्या संधीबद्दल समाधान व्यक्त केले. संवादाच्या माध्यमातून प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी होण्यास मदत होत असून अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचेही यावेळी सांगितले.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवीन ऑनलाईन प्रणाली होणार सुरु : मदत आणि उपचाराला मिळणार गती

### आता रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर करता येणार

मुंबई– राज्यातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना उपचारासाठी आर्थिक सहाय्य अधिक वेगात मिळणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची अद्यावत ऑनलाईन प्रणाली सुरू होणार आहे. या प्रणालीमुळे अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासात पूर्ण होणार आहे. विशेष म्हणजे आता रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर होणार आहेत. त्यामुळे रुग्णाला कोणत्याही प्रकारचा अर्ज भरावा लागणार नाही. त्यामुळे उपचार प्रक्रियेला गती मिळणार आहे. या प्रणालीचे येत्या काही दिवसातच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उदघाटन करण्यात येणार आहे अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षा कडून देण्यात आली आहे.

गेल्या काही वर्षभरापासून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामध्ये नावीन्य पूर्ण रुग्णस्नेही बदल करण्याचे काम सुरु आहे. त्याचाच एक भाग मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवी ऑनलाईन प्रणाली असणार आहे. रुग्णाने रुग्णालयात सर्व रीतसर कागदपत्रे दिल्यानंतर रुग्णालय प्रशासन त्याचा अर्ज मुख्यमंत्री सहायता निधी कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविणार आहे. त्या ठिकाणी नियमानुसार सर्व कागदपत्रे असल्यास अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. यामुळे रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकाला मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच, गेल्या आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्षप्रमुख रामेश्वर नाईक म्हणाले की, रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी ही ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात येत आहे. यामुळे आता अर्ज मंजुरीची प्रक्रिया जलद होऊन रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नवीन प्रणालीचे अधिकृत उद्घाटन लवकरच होणार असून, त्यानंतर राज्यभरात ती प्रभावीपणे राबवण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी गरजू रुग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

## मतदार यादीचे विशेष सखोल पुनरिक्षण नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन

धुळे (जिमाका) – भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार धुळे तालुक्यात मतदार यादीचे विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) सुरु होणार आहे. मतदारांनी आपल्याकडे येणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी मागणी केलेली माहिती देवून सहकार्य करावे, असे आवाहन सहायक मतदार नोंदणी अधिकारी ०६ धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघ तथा तहसिलदार अरुण शेवाळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार ,धुळे ग्रामीण यांचेवतीने मतदार यादीचे विशेष सखोल पुनरिक्षण होणार आहे. त्याची पूर्वतयारी म्हणून आपल्या गावातील विधानसभा मतदार यादीचे पुनरिक्षण मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यामार्फत सुरु आहे. या प्रक्रियेत सन २०२४ च्या मतदार यादीत नाव असलेल्या आणि सन २००२ च्या मतदार यादीतही नाव असलेल्या मतदारांचे मॅपिंग बीएलओ मार्फत केले जात आहे. सन २०२४ च्या यादी नाव आहे पण सन २००२ च्या यादीत नाव नाही, अशा मतदारांनी आपल्या आई, वडीलं किंवा आजी आजोबा याचे विधानसभा मतदार संघ क्रमांक, यादी भाग क्रमांक, यादी भागाचा अनुक्रमांक, मतदार ओळखपत्र क्रमांक ही माहिती शोधुन आपल्या यादी भागाच्या संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना द्यावी. यासाठी https://ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळाचा वापर करावा.

गावात नव्याने आलेले मतदार (उदा. लग्नानंतर आलेल्या महिला, नोकरी, कामानिमित्त आलेले पुरुष किंवा महिला) यांनीही वरील प्रमाणे आपल्या आई,वडील किंवा आजी आजोबांची सन २००२ मधील मतदार यादीतील माहिती शोधून मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना द्यावी. मतदारांनी आपल्याकडे येणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना मागणी केलेली माहिती देवून सहकार्य करावे, ही माहिती वेळेत न दिल्यास विशेष सखोल पुनरिक्षणामध्ये आपले नाव मतदार यादीतून वगळण्याची शक्यता नाकारता येत नाही. गैरसोय टाळण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेशी संपर्क साधावा व आपले नाव सन २००२ व २०२४ च्या मतदार यादीशी संलग्न करुन घ्यावे, असे आवाहन सहायक मतदार नोंदणी अधिकारी ०६ धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघ तथा तहसिलदार श्री. शेवाळे यांनी केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजेच डॉ. भीमराव रामजी आंबेडकर (१४ एप्रिल, १८९१ – ६ डिसेंबर, १९५६), हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य (दलित) लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. ते ब्रिटिश भारताचे मजूरमंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक होते. देशाच्या विविध क्षेत्रांत दिलेल्या योगदानामुळे त्यांना 'आधुनिक भारताचे शिल्पकार' किंवा 'आधुनिक भारताचे निर्माते' असेही म्हणतात.

आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या शिक्षण संस्थांमधून अर्थशास्त्र विषयात पीएच.डी. पदव्या मिळविल्या; तसेच त्यांनी कायदा, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या विषयांवर संशोधन केले. त्यांच्या सुरुवातीच्या कारकिर्दीत, ते एक अर्थशास्त्रज्ञ, प्राध्यापक आणि वकील होते. त्यानंतर त्यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रांत काम केले. ते भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्रचारामध्ये व चर्चांमध्ये सामील झाले, वृत्तपत्रे प्रकाशित केली, दलितांसाठी राजकीय हक्कांचा व सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला, तसेच आधुनिक भारताच्या निर्मितीत मोलाचे योगदान दिले.

इ.स. १९५६ मध्ये त्यांनी आपल्या अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. धर्मांतरानंतर काही महिन्यांनीच त्यांचे निधन झाले. इ.स. १९९० मध्ये, त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात केला. त्यांचा जन्मदिवस दरवर्षी आंबेडकर जयंती म्हणून भारतासह जगभरात साजरा केला जातो.७ इ.स. २०१२ मध्ये, द ग्रेटेस्ट इंडियन नावाच्या सर्वेक्षणात आंबेडकरांची 'सर्वश्रेष्ठ भारतीय' म्हणून निवड करण्यात आली आहे. आंबेडकरांच्या स्मरणार्थ अनेक स्मारके आणि चित्रणे लोकसंस्कृतीत उभारली गेली आहेत.

बाबासाहेब आंबेडकरांच्या वडिलांचे नाव रामजी तर आजोबांचे नाव मालोजीराव सकपाळ होते. मालोजी इंग्लिश राजसत्तेच्या सैन्यात शिपाई म्हणून भरती झाले होते. सैन्यातील नोकरीमुळे मालोजीराव सैनिकी शाळेत शिक्षण घेऊ शकले. त्यांनी रामानंद पंथाची दीक्षा घेतली होती.९ मालोजींना तीन मुलगे व एक मुलगी अशी चार अपत्ये होती. दोन मुलांनंतरच्या मिराबाई या मुलीचा जन्म झाला होता. तर इ.स. १८४८ च्या सुमारास जन्मलेले रामजी हे मालोजींचे चौथे अपत्य होते. मालोजींचा पहिला मुलगा घरदार त्यागून संन्यासी झाला. दुसरा मुलगा इंग्रजी सैन्यातच नोकरीस लागला. तिसरा मुलगा असलेल्या रामजींनी सैनिकी शाळेत शिक्षण घेतले व पुढे ते नॉर्मलची परीक्षाही उत्तीर्ण झाले.९ शिक्षण सुरू असताना रामजी इ.स. १८६६ च्या सुमारात वयाच्या १८व्या वर्षी इंग्रजी सैन्याच्या १०६ सॅपर्स अँड मायनर्स तुकडीत शिपाई म्हणून भरती झाले. रामजी १९ वर्षांचे असताना त्यांचा विवाह १३ वर्षीय भीमाबाईशी झाला. रामजी हे इंग्लिश बोलू शकत. ते नॉर्मल स्कूल (मॅट्रिक) उत्तीर्ण होते. पुढे रामजींनी ब्रिटिश भारतीय सैन्यामध्ये सुभेदार आणि सैनिकी शिक्षक म्हणून काम केले.रामजी व भीमाबाई या दांपत्याला सन १८९१ पर्यंत चौदा अपत्ये झाली होती. त्यापैकी गंगा, रमा, मंजुळा व तुळसा या चार मुली जगल्या. मुलांपैकी बाळाराम, आनंदराव व भीमराव (भिवा) ही तीन मुले हयात होती. भीमराव हा सर्वात लहान व चौदावे अपत्य होता.

रामजी ज्या पलटणीत होते ती पलटण इ.स. १८८८ मध्ये मध्य प्रदेशातील महू येथे लष्करी तळावर आली होती.१४ येथे सुभेदार रामजींना नॉर्मल स्कूलचे मुख्याध्यापक पद मिळाले होते. या काळात १४ एप्रिल १८९१ रोजी महू (आताचे डॉ. आंबेडकर नगर) या लष्करी छावणी असलेल्या गावी रामजी व भीमाबाईंच्या पोटी बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला.१३ रामजींनी मराठी व इंग्रजी भाषेचे यथाविधी शिक्षणही घेतले होते. भीमराव हे रामजी सकपाळ व आई भीमाबाई यांचे १४वे व अंतिम अपत्य होते. बाळाचे नाव भिवा असे ठेवण्यात आले, त्यांची भीम, भीमा व भीमराव ही नावेही प्रचलित झाली. आंबेडकरांचे कुटुंब हे त्याकाळी अस्पृश्य गणल्या गेलेल्या महार जातीचे आणि महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्याच्या मंडणगड तालुक्यातील आंबडवे या गावचे होते. ('आंबडवे' या गावचा 'अंबावडे' असा चुकीचा उल्लेख अनेक ठिकाणी केला गेलेला आहे.)१५१६ अस्पृश्य असल्यामुळे त्यांच्यासोबत नेहमी सामाजिक–आर्थिक भेदभाव केला गेला.१७ इ.स. १८९४ मध्ये सुभेदार रामजी सकपाळ इंग्रजी सैन्यातील मुख्याध्यापक पदाच्या नोकरीवरून निवृत्त झाले आणि महाराष्ट्रातल्या रत्नागिरी जिल्ह्यातील आपल्या मूळ गावाजवळील दापोली या गावातील कॅम्प दापोली वस्तीत परिवारासह राहू लागले. भीमराव वयाने लहान असल्यामुळे कॅम्प दापोली येथील शाळेत त्यास प्रवेश मिळाला नाही व भीमरावास घरीच अक्षर ओळख करून द्यावी लागली. इ.स. १८९६ मध्ये रामजींनी आपल्या कुटुंबासह दापोली सोडले व ते साताऱ्याला जाऊन तेथे राहिले. यावेळी भीमरावाचे वय पाच वर्षाचे झाले होते. रामजींनी इ.स. १८९६ च्या नोव्हेंबर महिन्यात सातारा येथील कॅम्प स्कूल या मराठी शाळेमध्ये भीमरावाचे नाव दाखल केले.१३ या वर्षीच त्यांनी कबीर पंथाची दीक्षा घेतली. त्यांच्या या स्थानांतरानंतर थोड्या कालावधीत इ.स. १८९६ मधे मस्तकशूल या आजाराने आंबेडकरांच्या आई भीमाबाईंचे निधन झाले, त्यावेळी आंबेडकर ५ वर्षाचे होते.१८ त्यानंतर भीमासह व अन्य मुलांचे संगोपन त्यांच्या आत्या मीराबाईंनी कठीण परिस्थितीत केले.

साताऱ्यात आल्यावर थोड्याच दिवसानंतर भाड्याने घेतलेल्या एका बंगल्यात आंबेडकर कुटुंब राहू लागले. त्यावेळी भीमरावाचे वय पाच वर्षाचे झाले होते. हे वय त्यास शाळेत प्रवेश देण्यास योग्य होते. रामजींनी इ.स. १८९६च्या नोव्हेंबर महिन्यात सातारा येथील कॅम्प स्कूलमध्ये भीमरावाचे नाव दाखल केले. इ.स. १८९८ साली रामजींनी जीजाबाई नावाच्या विधवेसोबत दुसरे लग्न केले. साताऱ्यातील कॅम्प स्कूलमधील मराठी शिक्षण पूर्ण केल्यानंतर साताऱ्यातीलच सातारा हायस्कूल या इंग्रजी सरकारी हायस्कूलमध्ये भीमरावाचे नाव दाखल केले.१९ कोकणासह महाराष्ट्रातील लोक पूर्वी आपले आडनाव आपल्या गावाच्या नावावरून ठेवत असत व त्यात शेवटी कर शब्द जोडण्याचा प्रघात आहे. त्यामुळेच बाबासाहेबांचे आडनाव सकपाळ असतांना त्यांचे वडील रामजी यांनी ७ नोव्हेंबर १९०० रोजी साताऱ्यातील गव्हर्नमेंट हायस्कूल (आताचे प्रतापसिंह हायस्कूल)मध्ये आंबडवेकर असे आडनाव नोंदवले. साताऱ्याच्या या शाळेत भीमरावांना शिकवण्यासाठी कृष्णा केशव आंबेडकर नावाचे शिक्षक होते. शाळेच्या दप्तरात नोंदवलेले भीमरावांचे आंबडवेकर हे आडनाव उच्चारताना त्यांना ते आडनिडे वाटत असे म्हणून माझे आंबेडकर हे नाव तू धारण कर, त्यांनी असे भीमरावांना सुचविले. त्यावर भीमरावांनी होकार दिल्यावर तशी नोंद शाळेत झाली. तेव्हापासून त्यांचे आडनाव आंबडवेकरचे 'आंबेडकर' असे झाले.२० नोव्हेंबर १९०४ मध्ये भीमरावांनी इंग्रजी चौथीची परीक्षा उत्तीर्ण केली व यावर्षीच रामजी सकपाळ मुंबईला सहपरिवार गेले.

**विशेष लेख..**

डिसेंबर १९०४ मध्ये रामजी सकपाळ सहपरिवार मुंबईला आले व तेथील लोअर परळ भागातील डबक चाळ (बदक चाळ) नावाच्या एका इमारतीच्या एका खोलीत राहू लागले.२१ मुंबईमधे आल्यावर भीमराव हे एल्फिन्स्टन रस्त्यावरील सरकारी शाळेत जाऊ लागले, एल्फिन्स्टन हायस्कूलमधे जाणारे ते पहिले अस्पृश्य विद्यार्थी होते.२२कबीर पंथीय असलेल्या रामजींनी मुलांना हिंदू साहित्याची ओळख करून दिली. इतर जातीतील लोकांच्या विरोधामुळे रामजींनी मुलांना सरकारी शाळेत शिकवण्यासाठी आपल्या लष्करातील पदाचा वापर केला. शाळेत प्रवेश मिळाला तरी भीमरावांना इतर विद्यार्थ्यांपासून वेगळे बसावे लागे आणि शिक्षकांचे साहाय्य मिळत नसे. त्यांना वर्गात बसण्याची परवानगी नव्हती. जेव्हा त्यांना तहान लागत असे, तेव्हा शाळेतील पाणी पिण्याच्या भांड्याला किंवा पेल्याला स्पर्श करण्याची त्यांना परवानगी नव्हती. तेव्हा एखादा उच्च जातीतील व्यक्ती उंचीवरून त्यांच्या ओंजळीवर पाणी ओतत असे. आंबेडकरांसाठी हे काम बहुधा शिपाई करीत. शिपाई उपलब्ध नसेल तर त्यांना दिवसभर पाण्याविनाच रहावे लागत असे; नंतर त्यांनी आपल्या लेखनात या घटनेचे शिपाई नाही, तर पाणी नाही असे वर्णन केले आहे.२३ शाळेत असतानाच इ.स. १९०६ मध्ये १४–१५ वर्षीय भीमरावांचे लग्न दापोलीच्या भिकू वलंगकर यांची ९–१० वर्षीय कन्या रामीबाई उर्फ रमाबाई यांच्याशी झाले. एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये शिकत असताना भीमरावांना वर्गातील स्पृश्य जातींच्या मुलांपासून दूर बसावे लागे. हायस्कूलमधील अनेक शिक्षक त्यांच्याशी तिरस्काराने वागत असत. आंबेडकर हे आपल्या विद्यार्थी जीवनात दररोज १८ तास अभ्यास करत असत. इ.स. १९०७ साली भीमराव एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये मॅट्रिकची परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाले. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर भीमराव आंबेडकरांच्या ज्ञातिबांधवांनी कृष्णाजी अर्जुन केळुसकर गुरुजी यांच्या अध्यक्षेखाली सभा भरवून भिवा रामजी आंबेडकरांचे कौतुक केले. एखाद्या अस्पृश्य मुलाने असे यश मिळविणे एवढे दुर्मिळ होते की, त्यांचे अभिनंदन करण्यासाठी तेव्हा एक जाहीर सभा भरवण्यात आली होती. यावेळी केळुसकर गुरुजींनी स्वतः लिहिलेल्या मराठी बुद्धचरित्राची एक प्रत भीमरावांना भेट म्हणून दिली. हे पुस्तक वाचल्यानंतर त्यांना पहिल्यांदाच बुद्धांच्या शिकवणुकींची माहिती मिळाली व ते बुद्धाप्रती आकर्षित झाले. आर्थिक अडचणींमुळे रामजी सकपाळ भीमरावांना महाविद्यालयीन शिक्षण देऊ शकतील, अशी परिस्थिती नव्हती. त्यामुळे केळुसकर गुरुजींनी मुंबईमध्ये महाराज सयाजीराव गायकवाड यांचेशी भीमरावांची भेट घालून दिली. भीमरावांची हुशारी पाहून महाविद्यालयात शिक्षण घेण्यासाठी महाराजांनी त्यांना दरमहा रु.२५ची शिष्यवृत्ती देण्याचे मंजूर केले. त्यानंतर ३ जानेवारी, इ.स. १९०८ रोजी भीमरावांनी एल्फिन्स्टन महाविद्यालयात प्रवेश घेतला.३० पुढे चार वर्षांनी इ.स. १९१२ मध्ये त्यांनी मुंबई विद्यापीठाची राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र विषय घेऊन बी.ए.ची पदवी संपादन केली आणि बडोदा संस्थानात नोकरीसाठी रुजू झाले. याच वर्षी १२ जानेवारी १९१२ रोजी त्यांना पहिला मुलगा यशवंत झाला. त्याच सुमारात २ फेब्रुवारी, इ.स. १९१३ रोजी मुंबईमध्ये त्यांचे वडील रामजींचे आजाराने निधन झाले. पुढे चार महिन्यांनी बडोदा नरेशांकडून प्रति महिने साडे अकरा पाउंड शिष्यवृत्ती घेऊन अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षण घेण्यासाठी त्यांनी प्रयाण केले.

आंबेडकर हे परदेशातून अर्थशास्त्रामध्ये डॉक्टरेट (पीएच.डी.) पदवी मिळवणारे पहिले भारतीय होते. तसेच ते दक्षिण आशियातून दोनदा डॉक्टरेट (पीएच.डी. व डी.एससी.) पदव्या मिळवणारे पहिले दक्षिण आशियाई होते.३२ त्यांनी नोव्हेंबर, १८९६ ते नोव्हेंबर १९२३ अशा २७ वर्षांत मुंबई विद्यापीठ, कोलंबिया विद्यापीठ, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि ग्रेज इन या शिक्षण संस्थांमधून उच्च शिक्षण घेतले. आंबेडकरांनी या दरम्यान बी.ए., दोनदा एम.ए., पी.एचडी., एम.एस्सी., बार–ट–लॉ आणि डी.एस्सी. या पदव्या मिळवल्या. १९५० च्या दशकात त्यांना एलएल.डी. आणि डी.लिट. या दोन सन्माननीय पदव्या सुद्धा प्रदान करण्यात आल्या. आंबेडकर हे त्यांच्या हयातीतील भारतातील सर्वात प्रतिभाशाली व सर्वाधिक उच्च विद्याविभूषित व्यक्ती होते.

केळुसकर गुरुजींनी मुंबईमध्ये बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांचेशी भीमरावांची भेट घालून दिली. यानंतर निर्णयसागर छापखान्याचे मालक दामोदर सावळाराम यंदे यांनीही प्रयत्न केल्यावर महाराजांनी त्यांना जानेवारी १९०८पासून दरमहा रु. २५ची शिष्यवृत्ती देऊ केली. त्यानंतर ३ जानेवारी इ.स. १९०८ रोजी रामजींनी भीमरावांचे नाव मुंबईतील एल्फिन्स्टन महाविद्यालयात प्रीव्हियसच्या वर्गात दाखल केले.३० भीमराव हे आंबेडकर घराण्यातील सर्वप्रथम महाविद्यालयीन विद्यार्थी झाले. या काळात रामजी डबकचाळ सोडून इंप्रूव्हमेंट ट्रस्टच्या (पोयबावाडी–परळ) चाळीत राहायला गेले. येथे भीमराव नियमित अभ्यास करत असे.३० महाविद्यालयात भीमरावांना इंग्लिश व फारसी विषयांत शेकडा ७५ पेक्षा जास्त गुण मिळत असे. तेथे इंग्लिशचे प्राध्यापक मुलर व फारसीचे प्राध्यापक के.बी. इराणी हे आंबेडकरांचे शिक्षक होते. आंबेडकर राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र हे मुख्य विषय घेऊन जानेवारी १९१३मध्ये बी.ए. परीक्षा उत्तीर्ण झाले. ते मुंबई विद्यापीठाची बी.ए.ची पदवी संपादन करणारे अस्पृश्य वर्गातील पहिले विद्यार्थी होते. महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या आर्थिक सहकार्यातून मुक्त व्हावे, असा विचार करून आंबेडकरांनी बडोदा संस्थानात नोकरी मिळवली व २३ जानेवारी १९१३ रोजी नोकरीवर रूजू झाले. पण नवव्या दिवशीच मुंबईत वडील आजारी असल्याची तार त्यांना मिळाली व दोन दिवसांनी ते मुंबईत आले. भीमरावांची वडिलांशी भेट झाल्यावर ३ फेब्रुवारी १९१३ रोजी रामजींचे निधन झाले. यानंतर ते बडोद्यातील नोकरीवर पुन्हा वेळेवर हजर होऊ शकले नाहीत. दरम्यान त्यांना पुढचे पदव्युत्तर शिक्षण घेण्याची व त्याकरिता अमेरिकेला जाण्याची संधी मिळाली.

बी.ए. उत्तीर्ण झाल्यावर आंबेडकरांसमोर नोकरी करून व घरची आर्थिक स्थिती सुधारणे, किंवा तर पदव्युत्तर शिक्षण घेणे आणि आपली शैक्षणिक पात्रता आणखी वाढवणे, असे पर्याय होते. महाराज सयाजीराव गायकवाड बडोदा संस्थानाच्या वतीने काही विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणासाठी अमेरिकेला पाठवण्याच्या विचारात होते. त्याचवेळी आंबेडकर महाराजांना भेटले व बडोदा येथे आपल्याला बरोबर होत असलेला सामाजिक अन्याय महाराजांना सांगितला; त्यावर महाराजांनी काही प्रतिक्रिया दिली नाही परंतु त्यांनी आंबेडकरांना उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देऊन अमेरिकेत पाठविणे पसंत केल्याचे सांगितले. ४ एप्रिल, १९१३ रोजी बडोदा संस्थानच्या विद्याधिकाऱ्यांनी परदेशात अभ्यास करण्यासाठी चार विद्यार्थी निवडले, यात आंबेडकर एक होते. या प्रत्येकास दरमहा साडे अकरा पाऊंड शिष्यवृत्ती मंजूर केली. त्यासाठी त्यांना एक करारपत्र लिहून द्यावे लागले. या करारपत्रावर साक्षीदार म्हणून त्रिभुवन जे. व्यास आणि अंताजी गोपाळ जोशी यांनी १८ एप्रिल, १९१३ रोजी सह्या केल्या. या करारानुसार शिष्यवृत्तीची मुदत १५ जून १९१३ ते १४ जून १९१६ पर्यंत एकूण तीन वर्षांची होती. त्यानंतर आंबेडकर अमेरिकेला जाण्यासाठी मुंबईच्या बंदरातून एस.एस. अंकोना बोटीने प्रवास करून २१ जुलै, १९१३ रोजी दुपारी १२ वाजता अमेरिकेतील न्यू यॉर्क येथे पोचले. या शहरातील कोलंबिया विद्यापीठामध्ये राज्यशास्त्र शाखेत त्यांनी जुलै १९१३ ते जून १९१६ या तीन वर्षांसाठी प्रवेश मिळवला. त्यांनी अर्थशास्त्र हा प्रमुख विषय आणि जोडीला समाजशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र आणि तत्त्वज्ञान हे विषय निवडले. त्यांनी अर्थशास्त्र व समाजशास्त्र या विषयांचा अभ्यास करून विद्यापीठातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक एडविन आर. के. सेलिग्मन यांचे आवडते विद्यार्थी झाले.

दरम्यानच्या काळात कोलंबिया विद्यापीठाच्या ग्रंथालयात लाला लजपतराय यांनी भीमरावांशी ओळख करून घेतली. भीमराव आंबेडकर या ग्रंथालयात सर्वांच्या आधी हजर असत आणि सर्वात शेवटी बाहेर पडत असत, याची माहिती लजपतराय यांना झाली होती. त्या अनुषंगानेही त्यांची ओळख झाली. एकदा लजपतराय व **(पुढील पानावर)**

**(मागील पानावरून) विशेष लेख...**

आंबेडकर यांचा अर्थशास्त्र व समाजशास्त्र संबंधित विषयांवर संवाद सुरू असताना प्राध्यापक एडविन सेलिग्मन तेथे आले व तेही संवादात सहभागी झाले. प्रा. सेलिग्मन हे आंबेडकरांचे राज्यशास्त्र आणि समाजशास्त्राचे सखोल ज्ञान जाणून होते. लजपतराय यांनी आंबेडकरांच्या ज्ञानाची स्तुती केली. त्याचवेळी सेलिग्मन यांनी आंबेडकरांबद्दल भीमराव आंबेडकर हे केवळ भारतीय विद्यार्थ्यांमध्येच नव्हे तर अमेरिकन विद्यार्थ्यांमध्येही सर्वात बुद्धिमान विद्यार्थी आहेत. असे म्हणले. एम.ए.च्या पदवीसाठी भीमरावांनी एन्शंट इंडियन कॉमर्स (प्राचीन भारतीय व्यापार) या विषयावर प्रबंध लिहून तो १५ मे, १९१५ रोजी कोलंबिया विद्यापीठाला सादर केला. २ जून, १९१५ रोजी या प्रबंधाच्या आधारावर त्यांना विद्यापीठाने एम.ए.ची पदवी प्रदान केली. हा प्रबंध नंतर ॲडमिशन अँड फायनान्स ऑफ इस्ट इंडिया कंपनी नावाचे प्रकाशित करण्यात आला. त्यानंतर आंबेडकरांनी पीएच.डी. पदवीसाठी द नॅशनल डिव्हिडंड ऑफ इंडिया: अ हिस्टॉरिकल अँड नलाटिकल स्टडी (भारताचा राष्ट्रीय लाभांश: इतिहासात्मक आणि विश्लेषणात्मक अध्ययन) नावाचा प्रबंध लिहिणे सुरू केले.४३ १९१७ मध्ये विद्यापीठाने त्यांचा प्रबंध स्वीकारून त्यांना पीएच.डी. (डॉक्टर ऑफ फिलॉसफी)ची पदवी देण्याचे मान्य केले मात्र यासोबत एक अट्टी घातली की ज्यावेळी हा प्रबंध छापून त्याच्या काही प्रती विद्यापीठात सादर केल्या जातील तेव्हाच आंबेडकरांना पीएच.डी. पदवी रीतसर दिली जाईल. मात्र प्रबंध स्वीकारल्यामुळे १९१७ मध्येच विद्यापीठाने आंबेडकरांना त्यांच्या नावापुढे 'डॉक्टर' (डॉ.) हा शब्द लावण्याची अनुमती दिली. आंबेडकरांनी आपल्या पीएच.डी. प्रबंधामध्ये, ब्रिटिश साम्राज्यशाहीचे भारत सरकार हजारो मैल दूर असलेल्या ब्रिटिश संसदेमधील सेक्रेटरी ऑफ स्टेट (भारतमंत्री) यांच्यामार्फत कसा कारभार करत होते आणि त्यामुळे चाललेली सरकारी उधळपट्टी आणि बेजबाबदारपणा भारतीय जनतेस कसा पिळून काढत होता यावर प्रकाश टाकला तसेच अंदाजपत्रक प्रथम कधी आले, प्रांतिक अर्थव्यवस्था केव्हापासून सुरू झाली, अर्थव्यवस्थेचा विस्तार कसा झाला याचे अभ्यासपूर्ण विवेचन केले. जगात निरनिराळ्या देशातील नागरिकांना ज्या अनेक प्रकारच्या करांचे ओझे वहावे लागते त्याचा उल्लेख करून ब्रिटिश साम्राज्यशाही केंद्र सरकारचे कर, स्थानिक स्वराज्यसंस्थांचे कर तसेच प्रांतिक सरकारचे कर याची छाननी त्यावेळच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून केली. त्यानंतर आठ वर्षांनी (इ.स. १९२५ मध्ये) आंबेडकरांचा पीएच.डी.चा प्रबंध ब्रिटिश भारतातील प्रांतीय अर्थव्यवस्थेची उत्क्रांती या नावाने लंडनच्या पी.एस. किंग अँड कंपनीने ग्रंथरूपात प्रकाशित केला. आंबेडकरांनी प्रबंधाच्या प्रती कोलंबिया विद्यापीठात सादर केल्या, त्यानंतर ८ जून १९२७ रोजी आंबेडकरांना पीएच.डी. ही डॉक्टरेट पदवी रीतसर प्रदान करण्यात आली. आंबेडकरांचे पीएच.डी. पदवीसाठीचे मार्गदर्शक प्रा. सेलिग्मन यांनी ग्रंथाची प्रस्तावना लिहिली होती. कोलंबिया विद्यापीठातील वास्तव्यानंतरही अनेक वर्षे सेलिग्मन यांच्याशी आंबेडकरांनी घनिष्ठ संबंध जोपासला होता. डॉ. आंबेडकरांनी आपला हा ग्रंथ महाराज सयाजीराव गायकवाड यांना कृतज्ञतापूर्वक अर्पण केला.

९ मे १९१६ रोजी कोलंबिया विद्यापीठमध्ये समाजशास्त्राचे प्राध्यापक डॉ. ए.ए. गोल्डनवायझर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित झालेल्या मानववंशशास्त्र विषयाच्या चर्चासत्रात कास्ट्स इन इंडिया : देअर मेकनिझम, जेनेसिस अँड डेव्हलपमेंट (भारतातील जाती : त्यांची रचना, उत्पत्ती आणि वृद्धी) नावाचा आपला एक नवीन शोधलेख वाचला.४५ शास्त्रीय विवेचन केलेला हा शोधलेख मे १९१७ इंडियन अँटीक्वेरी नावाच्या मासिकात प्रकाशित झाला. नंतर हाच शोधलेख पुस्तकाच्या रूपात प्रकाशित झाला. हे आंबेडकरांचे प्रकाशित झालेले पहिले पुस्तक होते. कोलंबिया विद्यापिठामध्ये आंबेडकरांना जॉन ड्युई यांचेही मार्गदर्शन मिळाले. आंबेडकरांच्या समता आणि सामाजिक न्यायाच्या कल्पनांनी ड्युई सुद्धा प्रभावित झाले होते. आंबेडकरांनी या विद्यापीठात प्रथमच स्वातंत्र्य, समता आणि बंधुता तत्त्वांचा अनुभव घेतला होता. कोलंबिया विद्यापीठातील जॉन ड्युई, जेम्स शॉटवेल, एडविन सेलिगमन आणि जेम्स हार्वे रॉबिन्सन हे महान प्राध्यापक मला लाभले आणि येथेच आयुष्यातील अनेक चांगले मित्र येथे मिळाले, असे आंबेडकरांनी एका मुलाखतीत म्हणले होते. आंबेडकरांनी ३ वर्षांसाठी मिळालेल्या शिष्यवृत्तीचा वापर करून अमेरिकेतील अभ्यासक्रम केवळ ३ वर्षांच्या आधी पूर्ण केला होता. लंडनला जाऊन अर्थशास्त्रामध्ये संशोधन करून अन्य पदव्या मिळवाव्यात ह्या विचाराने त्यांनी फेब्रुवारी १९१६ मध्ये महाराज सयाजीराव गायकवाड यांना दोन-तीन वर्ष शिष्यवृत्तीची मुदतवाढ मिळविण्यासाठी विनंतीपत्र पाठवले. मात्र ती विनंती अमान्य करण्यात आली. त्यानंतर आंबेडकर प्राध्यापक सेलिग्मन यांच्या शिफारसपत्रासह गायकवाडांना दुसरे विनंती पत्र पाठवले, मात्र यावेळी त्यांना केवळ एका वर्षाकरिता शिष्यवृत्तीची मुदत वाढवून देण्यात आली, मग मे १९१६ मध्ये ते लंडनला गेले.

आंबेडकरांनी अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठातील आपल्या अभ्यासक्रम संपल्यावर पुढील शिक्षण लंडन मध्ये करण्याचे ठरवले. इ.स. १९१६ च्या जून महिन्यात ते लिव्हरपूल बंदरात उतरले व पुढचा प्रवास रेल्वेने करत लंडनला पोहोचले. कोलंबिया विद्यापीठाचे प्राध्यापक सीगर यांनी लंडन विद्यापीठाचे अर्थशास्त्राचे प्राध्यापक एडविन कॅनन यांना आंबेडकरांसाठी परिचयपत्र दिले होते. डॉ. भीमराव आंबेडकरांची अर्थशास्त्रातील प्रगती एखाद्या अर्थशास्त्राच्या प्राध्यापकापेक्षाही जास्त आहे असे त्या परिचयपत्रात सीगर यांनी लिहिले होते. तसेच प्रा. सेलिग्मन यांनीही अर्थशास्त्रज्ञ सिडने वेब यांच्या नावे परिचयपत्र आंबेडकरांजवळ दिले होते, ज्यात आंबेडकरांना अर्थशास्त्राच्या विविध ग्रंथांचा अभ्यास करता यावा म्हणून लंडन येथील विविध ग्रंथालयात प्रवेश मिळवून द्यावा असे सांगितले होते. त्यानुसार वेब यांनी लंडनमधील इंडिया हाउसच्या ग्रंथालयात आंबेडकरांना अभ्यास करता येईल अशी सोय उपलब्ध करून दिली. अर्थशास्त्रामध्ये पदव्या घेण्याच्या हेतूने इ.स. १९१६ च्या ऑक्टोबर महिन्यात आंबेडकरांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्समध्ये प्रवेश घेतला. कोलंबिया विद्यापीठात एम.ए. व पीएच.डी. या पदव्यांसाठी आंबेडकरांनी अर्थशास्त्राचा अभ्यास केला होता, त्यामुळे बी.एस्सी.ची परीक्षा न देता थेट एम.एस्सी. साठी प्रवेश मिळावा, अशी प्रा. कॅनन यांच्या शिफारशीसह असलेली विनंती लंडन विद्यापीठाने मान्य केली. हा अभ्यास सुरू असतानाच समांतर बॅरिस्टर होण्यासाठी ११ नोव्हेंबर १९१६ रोजी लंडनमधील ग्रेज इन मध्ये प्रवेश घेतला. एम.एस्सी. पदवी मिळवण्याकरिता प्रॉव्हिन्शियल डीसेंट्रलायझेशन ऑफ इम्पिरियल फायनान्स (भारतीय शाही अर्थव्यवस्थेचे प्रांतीय विकेंद्रीकरण) विषयावर प्रबंध लिहिणे सुरू केले. परंतु त्यांच्या एक वर्ष शिष्यवृत्तीची कालमर्यादा संपल्यामुळे अभ्यास अर्धवट सोडून त्यांना भारतात परतावे लागले. लंडन सोडण्यापूर्वी आंबेडकरांनी पुढील चार वर्षांच्या कालमर्यादेत म्हणजे ऑक्टोबर १९१७ ते सप्टेंबर १९२१ पर्यंत कोणत्याही वेळी लंडन येऊन आपला अपूर्ण राहिलेला अभ्यास करण्यासाठी पुन्हा प्रवेश घ्यावा, अशी लंडन विद्यापीठाकडून परवानगी मिळवली होती.

जुलै इ.स. १९१७ मध्ये आंबेडकर मुंबईला परत आले. बडोदा संस्थानच्या करारान्वये त्यांनी बडोद्यात दरमहा एकशे पन्नास रुपयांची नोकरी घेतली. आंबेडकरांना महाराजांचे मिलिटरी सेक्रेटरी म्हणून नेमण्यात आले. येथे आंबडकर अस्पृश्य असल्याने आपल्या कार्यालयात अन्य सहकारी व कर्मचारी त्यांचा सतत अपमान करीत असत.५५ आंबेडकरांनी गायकवाडांना याबाबतचे निवेदन दिले होते परंतु यावर कार्यवाही झाली नाही. अस्पृश्य असल्यामुळे बडोद्यात राहण्यासाठी आंबेडकरांना जागा मिळाली नाही त्यामुळे नोकरी सोडण्याचा निर्णय त्यांनी घेतला व १९१७ च्या नोव्हेंबर महिन्यात मुंबईला परतले.५६ त्यांना दोन पारशी विद्यार्थ्यांना त्यांच्या घरी जाऊन शिकविण्याची दरमहा १०० मिळणारी शिकवणी त्यांनी घेतली. जोडीला त्यांनी व्यापाऱ्यांना आणि व्यापारी संस्थांना सल्ले देणारी स्टॉक्स अँड शेअर्स ॲडव्हायझर्स नावाची कंपनी सुरू केली. मात्र ही कंपनी महार व्यक्तीची आहे असे समजल्यावर लोकांचे सल्ले घेण्यास येणे बंद झाले व आंबेडकरांना आपली कंपनी बंद करावी लागली.५७ दावर्स कॉलेज ऑफ कॉमर्स या व्यापारविषय शिक्षण सल्ले देणाऱ्या महाविद्यालयामध्ये अर्थशास्त्र, बँकेचे व्यवहार आणि व्यापारी कायदे हे विषय शिकवण्यासाठी प्राध्यापक म्हणून आंबेडकरांना दरमहा पन्नास रुपये वेतनावर नियुक्त करण्यात आले. दरमहा दीडशे रुपयांची ही आवक घरखर्च व शिक्षण पूर्ण करण्यासाठी साठवणूकीसाठी तोकडी होती. ते अर्थशास्त्रीय प्रश्नांवर लेख लिहून वर्तमानपत्रांकडे प्रसिद्धीसाठी पाठवत यातून त्यांना थोडी आर्थिक मदत होई. याखेरीज आंबेडकरांनी कास्ट्स इन इंडिया व स्मॉल होल्डिंग इन इंडिया अँड देअर रेमिडीज हे आपले दोन प्रबंध पुस्तकस्वरूपाने प्रसिद्ध केले. यातूनही त्यांना पैसा जमा करण्याइतपत अर्थ प्राप्ती झाली नाही. या दरम्यान ते मुंबईतील विविध ग्रंथालयात जात आणि लंडनच्या अभ्यासास उपयुक्त अशा ग्रंथांचे वाचन करत व टिपणे काढत. पुढे सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स या मुंबईतील सरकारी महाविद्यालयात राजकीय अर्थशास्त्र विषयाच्या प्राध्यापकाची जागा दोन वर्षांकरीता रिकामी झालेल्या जागेवर शासनाने १० नोव्हेंबर १९१८ रोजी डॉ. आंबेडकरांची नेमणूक केली. त्यांना या नोकरीचा पगार दरमहा ४५० रुपये मिळत असे. याचदरम्यान इ.स. १९१८ मध्ये त्यांचे मोठे भाऊ आनंदराव यांचे निधन झाले आणि संपूर्ण कुटुंबाची घरखर्चाची जबाबदारी एकट्या भीमरावांवर आली. आंबेडकरांच्या अर्थशास्त्रावरील व्याख्यानांनी त्यांचे विद्यार्थी प्रभावित होत असत. ते विद्यार्थीप्रिय प्राध्यापक बनले. त्यांचे लेक्चर्स ऐकण्यासाठी अन्य महाविद्यालयांचेही विद्यार्थी वर्गात येऊन बसत असत. आंबेडकर सिडनहॅम महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील प्रामुख्याने अर्थशास्त्रावरील ग्रंथ वाचत असत व टिपणे काढत असत. आंबेडकर घरखर्चासाठी शंभर रुपये देऊन बाकीचे पैसे पुढील शिक्षणासाठी जमा करून ठेवत असत. ११ मार्च १९२० रोजी त्यांची प्राध्यापकाची नोकरी संपली.६१ सामाजिक कार्याच्या माध्यमातून आंबेडकरांचा कोल्हापूर संस्थानचे राजर्षी शाहू महाराज यांच्याशी परिचय झाला होता. त्यामुळे जेव्हा आंबेडकर पुढील शिक्षणासाठी लंडनला जाण्याच्या तयारीला लागले तेव्हा त्यांना शाहू महाराजांनी दीड हजार रुपये सहकार्य म्हणून दिले. ५ जुलै १९२० रोजी 'सिटी ऑफ एक्स्टिर' या बोटीने आंबेडकर लंडनकडे रवाना झाले.

३० सप्टेंबर १९२० रोजी आंबेडकरांनी लंडन स्कूल इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स आणि ग्रेज-इन मध्ये पुन्हा प्रवेश घेतला. ते सकाळी सहा वाजता ग्रंथालयात जात, ग्रंथालयात सर्वप्रथम त्यांचाच प्रवेश होई.६४ दिवसभर पुरेल इतके साहित्य घेउन ते एकाबैठकी अखंड अखंड अभ्यास करीत. दुपारच्या वेळी खाण्यासाठीच ते जागेवरून थोडा वेळ आपल्या जागेवरून उठत असत. ग्रंथालय सायंकाळी बंद होत असताना ते सर्वात शेवटी बाहेर पडत असत. राहण्याच्या ठिकाणीही ते जेवणानंतर रात्री मध्यरात्रीपर्यंत अभ्यास करत असत. खाणे, आराम करणे, झोप घेणे किंवा मनोरंजनासाठी वेळ देणे; हे सर्व त्यांच्या दृष्टीने महत्वाचे नसून सतत अभ्यास करणे, हे त्यांचे ध्येय होते. वर्षभरात आंबेडकरांनी त्यांचा शोधप्रबंध प्रॉव्हिन्शियल डीसेंट्रलायझेशन ऑफ इम्पिरियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया (ब्रिटिश भारतातील साम्राज्यीय अर्थव्यवस्थेचे प्रांतीय विकेंद्रीकरण) तयार केला आणि जून १९२१ मध्ये एम.एस्सी.च्या पदवीसाठी लंडन विद्यापीठात सादर केला. विद्यापीठाने प्रबंध स्वीकारून २० जून १९२१ रोजी त्यांना अर्थशास्त्रातील एम.एस्सी. ही पदवी प्रदान केली. २८ जून १९२२ रोजी ग्रेज-इन संस्थेने त्यांना बॅरिस्टर-ट-लॉ (बार-ट-लॉ) ही कायद्याची उच्चतम पदवी प्रदान केली. त्यानंतर 'द प्रोब्लम ऑफ रुपी' (रुपयाचा प्रश्न) हा अर्थशास्त्रीय प्रबंध तयार करून 'डॉक्टर ऑफ सायन्स' (डी.एस्सी.)च्या पदवीसाठी ऑक्टोबर १९२२ मध्ये लंडन विद्यापीठात सादर केला. त्यानंतर, अर्थशास्त्रावर संशोधनात्मक लेखन करून जर्मनीच्या बॉन विद्यापीठाचीही डॉक्टरेट पदवी मिळवावी हा विचार करून ते जर्मनीला गेले आणि बॉन विद्यापीठामध्ये प्रवेश घेतला. ते जर्मन भाषाही शिकलेले होते.६७ तेथे तीन महिने राहून त्यांनी प्रबंधलेखनाची तयारी केली. त्याचवेळी शिक्षक एडविन कॅनन यांनी डी.एस्सी. पदवी संदर्भात लंडनला येण्यासंबंधीचे पत्र त्यांना पाठवल्यामुळे ते लगेच लंडनला परतले. प्रबंधात आंबेडकरांनी भारतातील ब्रिटिश साम्राज्याच्या धोरणांवर टीका केलेली असल्यामुळे मार्च १९२३ मध्ये परीक्षकांनी स्वतःच्या प्रबंधाचे त्यांच्या धोरणानुसार पुनर्लेखन करण्याचे सांगितले. यासाठी तीन-चार महिन्यांचा कालावधी लागणार होता. यादरम्यान त्यांच्याजवळील पैसे संपत चालले होते म्हणून त्यांनी भारतात जाऊन तेथे प्रबंध पूर्ण करण्याचे ठरवले. त्यांनी बॉन विद्यापीठाचा प्रबंध सोडून दिला. आंबेडकर लंडनहून बोटीने भारताकडे निघाले व ३ एप्रिल १९२३ रोजी ते मुंबईला पोहोचले. ऑगस्ट १९२३ मध्ये आंबेडकरांनी आपले निष्कर्ष न बदलता लिखाणाची पद्धत बदलून प्रबंध लंडन विद्यापीठाला पुन्हा एकदा पाठवला. विद्यापीठाने तो प्रबंध मान्य करत नोव्हेंबर १९२३ मध्ये त्यांना डी.एस्सी.ची पदवी प्रदान केली. लंडनच्या पी.एस. किंग अँड कंपनी प्रकाशन संस्थेने द प्रोब्लेम ऑफ रुपी हा प्रबंध इ.स. १९२३ च्या डिसेंबर मध्ये ग्रंथरूपाने प्रसिद्ध केला. या ग्रंथाला त्यांचे मार्गदर्शक अर्थशास्त्रज्ञ डॉ. कॅनन यांनी प्रस्तावना लिहिली होती. हा प्रबंध आंबेडकरांनी आपल्या आई-वडिलांस अर्पण केला होता. या संशोधनांमुळे तसेच ग्रंथलेखनामुळे अर्थशास्त्र व राज्यशास्त्र ज्ञानशाखांतील तज्ज्ञ व्यक्ती तसेच निष्णात कायदेपंडित म्हणून आंबेडकर ओळखले जाऊ लागले.७० इंग्लंडमध्ये शिकत असताना ज्या अभ्यासक्रमाला ८ वर्षे लागतात तो आंबेडकरांनी २ वर्षे ३ महिन्यांत यशस्वी तऱ्हेने पूर्ण केला होता. यासाठी त्यांना दररोज २४ तासांपैकी २१ तास अभ्यास करावा लागला.

आंबेडकर १९२२ मध्ये ग्रेज इन येथून बॅरिस्टर-ट-लॉ ही पदवी घेउन ३ एप्रिल, १९२३ रोजी मुंबईत परतले. समाजकार्य करावे व अर्थार्जनासाठी वकिली करावी असा निर्णय त्यांनी घेतला व परळच्या दामोदर हॉलमध्ये पहिल्या मजल्यावर एक खोली कार्यालयासाठी मिळवली. जून महिन्यात त्यांनी वकिलीच्या प्रॅक्टिससाठी मुंबई उच्चन्यायालयात आपले नाव नोंदवण्यासाठी अर्ज दाखल केला व ५ जुलै, १९२३ रोजी उच्च न्यायालयाने त्यांचे नाव नोंदवून घेतले. वकिली सुरू झाल्यावर आंबेडकर अस्पृश्य समाजाचे असल्याने स्पृश्य समाजाच्या वकिलांनी त्यांना सहकार्य करण्याचे टाळले. अशा स्थितीत बाळकृष्ण गणेश मोडक नावाच्या एका स्पृश्य वकीलाने आंबेडकरांना वकिली करत राहण्यासाठी सहकार्य केले. आंबेडकरांना पहिली केस म्हणून नाशिक जिल्ह्यातल्या आव्हाळ्याच्या महार जातीच्या जाधव बंधूंची केस मिळाली. ही केस वर्षभर चालली व यशस्वीही झाली. केसची फी म्हणून आंबेडकरांना सहाशे रुपये मिळाले.७८ वकिलीतून घरखर्च भागत नसल्यामुळे त्यांनी बॉटलीबॉईज अकौंटसी इन्स्टिट्यूटमध्ये मर्कंटाइल लॉचे प्राध्यापक म्हणून नोकरी केली. याचे त्यांना महिन्याला दोनशे रुपये वेतन मिळे. ही प्राध्यापक पदाची नोकरी त्यांनी १० जून, १९२५ ते ३१ मार्च, १९२८ पर्यंत केली.

भारतातील वर्गलढ्याला आणि जातीअंताच्या लढ्याला आकार आणि दिशा देण्याचे काम आंबेडकरांनी केले. जागतिक पातळीवर शोषण मुक्ती आणि समतेसाठीच्या लढ्यांमध्येही आंबेडकर प्रेरणादायी ठरले आहेत.८४ जगाच्या इतिहासात असे योगदान करणाऱ्या अत्युच्च पातळीवरच्या निवडक व्यक्तींमध्ये आंबेडकरांचे स्थान आहे, असे डॉ. गेल ऑम्वेट सांगतात.८४ सामाजिक सुधारणा क्षेत्राच्या संदर्भात विशेषतः वर्ग, जात, धर्म, लिंग ह्यांचा भेदभाव न करता सर्व नागरिकांना समान अधिकार यासाठी आंबेडकरांनी काम केले. त्यांनी वेगवेगळ्या जातीतल्या लोकांमधली दरी मिटण्यासाठी तीन महत्त्वाच्या मार्गांचा उल्लेख केला होता – लग्न, खानपान आणि सांस्कृतिक मिलाप.८५ आंबेडकरांना बालपणापासून अस्पृश्यतेचा सामना करावा लागला.८६ इ.स. १९३५-३६ या कालावधी दरम्यान लिहिलेल्या वेटिंग फॉर अ व्हिझा या आपल्या आत्मकथेत आंबेडकरांनी अस्पृश्यतेसंबंधी त्यांना आलेल्या कटु अनुभवांच्या आठवणींच्या नोंदी केलेल्या आहेत.२३८७ हे आत्मचरित्रपर पुस्तक कोलंबिया विद्यापीठात 'पाठ्यपुस्तक' म्हणून वापरले जाते. **(क्रमशः)**

# जल हेच जीवन

सर्वसाधारणत पाणी हे तीन अवस्थांमध्ये आढळते. बर्फ, पाणी व हवेतील पाण्याची वाफ, आपण आपल्या दैनदिन जीवनात सकाळी उठल्या पासून ते रात्री झापेपर्यंत घरात पाण्याचा वापर करतो, पृथ्वी वरील सर्व पाणी आपण वापरू शकत नाही कारण समुद्रातील पाणी खारट आहे. काही पाणी गोठलेल्या अवस्थेत आहे. अत्यल्प पाणी पिण्यासाठी उपलब्ध आहे. तरीदेखील ते सर्व सजीवांना पुरेसे आहे.

पृथ्वीवरील उपलब्ध पाणी पैकी आपणास वापरात येऊ शकणारे पाण्याचे प्रमाण शेकडा ०.०३% इतके आहे, पाण्याशिवाय दिवस काढणे हे आपल्या सर्वांना जवळजवळ अशक्य आहे. मानवी शरीराच्या सर्व क्रिया सुलभ चालाव्यात म्हणून दररोज तीन ते चार लीटर पाणी पिण्याची गरज असते. इतर सजीवांना देखील पाण्याची अशीच गरज असते. त्यांच्या शरीराच्या आकारमानानुसार हे प्रमाण कमी-जास्त असते. यावरूनच आपल्या ला पाण्याचे महत्त्व लक्षात येते. अनेक पदार्थ पाण्यामध्ये सहज विरघळतात म्हणून पाणी हे वैश्विक द्रावक आहे.कोणत्याही सजीवाला पाण्याशिवाय जिवंत राहणे शक्य नाही, म्हणून पाण्याला 'जीवन' असे म्हणतात. यावरूनच आपण असे म्हणतो जल हेच जीवन.

इतर सर्व सजीवांमध्ये मानव मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर करतो. पृथ्वीवरील पाण्याचे नियमन जलचक्रा द्वारे होते जलचक्राला बाष्प पुरवण्याचे काम महासागराकडून होत असते. त्यापासूनच पाऊस पडून जमिनीवर गोड्या पाण्या चे स्रोत निर्माण होतात.

पाणी हे आपल्याला ओढे, नदी, तळी, झरे, सरोवरे हे जमिनीवरील नैसर्गिक स्रोत यांद्वारे आपणास मिळते, त्याशिवाय आपण कूपनलिका, विहीर खोदून भूगर्भातील पाण्याचा उपसा करत असतो. यासोबतच आपण नद्यांवर बंधारे, लहान मोठी धरणेही बांधली आहेत. वाढती लोकसंख्या , उद्योग, शेती यासाठी पाण्याचा अनिर्बंध वापर होत असल्यामुळे आता हे पाणी कमी पडू लागले आहे. यामुळेच पाणीटंचाई ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

जैविक स्तरावर, पाणी जीवनासाठी आवश्यक आहे. हा सजीवांच्या पेशींचा एक प्रमुख घटक आहे, सामान्यत: एखाद्या सजीवाच्या शरीराच्या वजनाच्या ७०-९०% भाग बनवतो. मानवांमध्ये, तापमान नियंत्रण, पचन आणि उत्सर्जन यासह विविध महत्त्वपूर्ण कार्यांमध्ये पाणी हे मुलभूत घटक आहे.

वनस्पतीच्या प्रकाशसंश्लेषणामध्ये देखील पाणी हे महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, ही प्रक्रिया म्हणजे ज्याद्वारे वनस्पती सूर्यप्रकाशाचे रासायनिक उर्जेमध्ये रूपांतर होते. ही प्रक्रिया केवळ वनस्पतींचे जीवन टिकवून ठेवत नाही तर ऑक्सिजन देखील तयार करते, जे मानवांसह सर्व जीवांच्या अस्तित्वासाठी आवश्यक आहे. अशा प्रकारे, पृथ्वीवरील जीवनाला चालना देणाऱ्या ऊर्जा परिवर्तनाच्या केंद्रस्थानी पाणी आहे.

पर्यावरणीयदृष्ट्या, नद्या, तलाव आणि महासागर यांसारखे जलस्रोत विविध प्रजातींचे निवासस्थान आहेत. जलीय परिसंस्था या ग्रहावरील सर्वात उत्पादक आणि जैवविविध आहेत. ते असंख्य जीवांसाठी अन्न, निवारा आणि प्रजनन प्रदान करतात. उदाहरणार्थ, पाणथळ जागा अनेक माशांच्या प्रजातींसाठी महत्वपूर्ण आहे.

पाऊस, या जलविज्ञान चक्राचा एक महत्त्वाचा घटक, गोड्या पाण्याचे स्त्रोत पाऊस भरून काढतो, वनस्पतींच्या वाढीस समर्थन देतो आणि स्थलीय जीवन टिकवून ठेवतो.

पाण्याची भूमिका आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रांमध्ये विस्तारित आहे, शेती, उद्योग आणि दैनंदिन मानवी गरजा ह्या पाण्यावर अवलंबून आहेत. जगातील बहुसंख्य लोकसंख्येचे पालनपोषण करणारी शेती सिंचनासाठी पाण्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. पिकांची लागवड आणि पशुसंवर्धन वाढवण्यासाठी, अन्न सुरक्षा आणि उपजीविकेवर थेट प्रभाव टाकण्यासाठी विश्वसनीय जलस्रोत आवश्यक आहेत. बऱ्याच क्षेत्रांमध्ये, विशेषतः विकसनशील देशांमध्ये, शेतीसाठी पाण्याची उपलब्धता ही आर्थिक स्थिरता आणि वाढीसाठी एक महत्त्वपूर्ण निर्धारक आहे.

उद्योग देखील मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर करतात, मग ते उत्पादन, ऊर्जा उत्पादन किंवा खाणकामासाठी असो. पाण्याचा वापर यंत्रसामग्री थंड करण्यासाठी, कच्च्या मालावर प्रक्रिया करण्यासाठी आणि जलविद्युत निर्मितीसाठी केला जातो. जलस्रोतांची उपलब्धता अनेकदा स्थानिक आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम करणाऱ्या औद्योगिक स्थान आणि प्रमाण ठरवते. सामाजिक स्तरावर, पाणी मानवी दैनंदिन जीवनात केंद्रस्थानी आहे. ते पिणे, स्वयंपाक करणे, स्वच्छता यासाठी सर्वसाधारणत पाणी हे तीन अवस्थांमध्ये आढळते. बर्फ, पाणी व हवेतील पाण्याची वाफ, आपण आपल्या दैनदिन जीवनात सकाळी उठल्या पासून ते रात्री झापेपर्यंत घरात पाण्याचा वापर करतो, पृथ्वी वरील सर्व पाणी आपण वापरू शकत नाही कारण समुद्रातील पाणी खारट आहे. काही पाणी गोठलेल्या अवस्थेत आहे. अत्यल्प पाणी पिण्यासाठी उपलब्ध आहे. तरीदेखील ते सर्व सजीवांना पुरेसे आहे.

पृथ्वीवरील उपलब्ध पाणी पैकी आपणास वापरात येऊ शकणारे पाण्याचे प्रमाण शेकडा ०.०३% इतके आहे, पाण्याशिवाय दिवस काढणे हे आपल्या सर्वांना जवळजवळ अशक्य आहे. मानवी शरीराच्या सर्व क्रिया सुलभ चालाव्यात म्हणून दररोज तीन ते चार लीटर पाणी पिण्याची गरज असते. इतर सजीवांना देखील पाण्याची अशीच गरज असते. त्यांच्या शरीराच्या आकारमानानुसार हे प्रमाण कमी-जास्त असते. यावरूनच आपल्या ला पाण्याचे महत्त्व लक्षात येते. अनेक पदार्थ पाण्यामध्ये सहज विरघळतात म्हणून पाणी हे वैश्विक द्रावक आहे.कोणत्याही सजीवाला पाण्याशिवाय जिवंत राहणे शक्य नाही, म्हणून पाण्याला 'जीवन' असे म्हणतात. यावरूनच आपण असे म्हणतो जल हेच जीवन.

इतर सर्व सजीवांमध्ये मानव मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर करतो. पृथ्वीवरील पाण्याचे नियमन जलचक्रा द्वारे होते जलचक्राला बाष्प पुरवण्याचे काम महासागराकडून होत असते. त्यापासूनच पाऊस पडून जमिनीवर गोड्या पाण्या चे स्रोत निर्माण होतात.

पाणी हे आपल्याला ओढे, नदी, तळी, झरे, सरोवरे हे जमिनीवरील नैसर्गिक स्रोत यांद्वारे आपणास मिळते, त्याशिवाय आपण कूपनलिका, विहीर खोदून भूगर्भातील पाण्याचा उपसा करत असतो. यासोबतच आपण नद्यांवर बंधारे, लहान मोठी धरणेही बांधली आहेत. वाढती लोकसंख्या , उद्योग, शेती यासाठी पाण्याचा अनिर्बंध वापर होत असल्यामुळे आता हे पाणी कमी पडू लागले आहे. यामुळेच पाणीटंचाई ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

जैविक स्तरावर, पाणी जीवनासाठी आवश्यक आहे. हा सजीवांच्या पेशींचा एक प्रमुख घटक आहे, सामान्यत: एखाद्या सजीवाच्या शरीराच्या वजनाच्या ७०-९०% भाग बनवतो. मानवांमध्ये, तापमान नियंत्रण, पचन आणि उत्सर्जन यासह विविध महत्त्वपूर्ण कार्यांमध्ये पाणी हे मुलभूत घटक आहे.

वनस्पतीच्या प्रकाशसंश्लेषणामध्ये देखील पाणी हे महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, ही प्रक्रिया म्हणजे ज्याद्वारे वनस्पती सूर्यप्रकाशाचे रासायनिक उर्जेमध्ये रूपांतर होते. ही प्रक्रिया केवळ वनस्पतींचे जीवन टिकवून ठेवत नाही तर ऑक्सिजन देखील तयार करते, जे मानवांसह सर्व जीवांच्या अस्तित्वासाठी आवश्यक आहे. अशा प्रकारे, पृथ्वीवरील जीवनाला चालना देणाऱ्या ऊर्जा परिवर्तनाच्या केंद्रस्थानी पाणी आहे.

पर्यावरणीयदृष्ट्या, नद्या, तलाव आणि महासागर यांसारखे जलस्रोत विविध प्रजातींचे निवासस्थान आहेत. जलीय परिसंस्था या ग्रहावरील सर्वात उत्पादक आणि जैवविविध आहेत. ते असंख्य जीवांसाठी अन्न, निवारा आणि प्रजनन प्रदान करतात. उदाहरणार्थ, पाणथळ जागा अनेक माशांच्या प्रजातींसाठी महत्वपूर्ण आहे. पाऊस, या जलविज्ञान चक्राचा एक महत्त्वाचा घटक, गोड्या पाण्याचे स्त्रोत पाऊस भरून काढतो, वनस्पतींच्या वाढीस समर्थन देतो आणि स्थलीय जीवन टिकवून ठेवतो.

पाण्याची भूमिका आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रांमध्ये विस्तारित आहे, शेती, उद्योग आणि दैनंदिन मानवी गरजा ह्या पाण्यावर अवलंबून आहेत. जगातील बहुसंख्य लोकसंख्येचे पालनपोषण करणारी शेती सिंचनासाठी पाण्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. पिकांची लागवड आणि पशुसंवर्धन वाढवण्यासाठी, अन्न सुरक्षा आणि उपजीविकेवर थेट प्रभाव टाकण्यासाठी विश्वसनीय जलस्रोत आवश्यक आहेत. बऱ्याच क्षेत्रांमध्ये, विशेषतः विकसनशील देशांमध्ये, शेतीसाठी पाण्याची उपलब्धता ही आर्थिक स्थिरता आणि वाढीसाठी एक महत्त्वपूर्ण निर्धारक आहे.

उद्योग देखील मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर करतात, मग ते उत्पादन, ऊर्जा उत्पादन किंवा खाणकामासाठी असो. पाण्याचा वापर यंत्रसामग्री थंड करण्यासाठी, कच्च्या मालावर प्रक्रिया करण्यासाठी आणि जलविद्युत निर्मितीसाठी केला जातो. जलस्रोतांची उपलब्धता अनेकदा स्थानिक आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम करणाऱ्या औद्योगिक स्थान आणि प्रमाण ठरवते. आवश्यक आहे. स्वच्छ, सुरक्षित पिण्याचे पाणी मिळणे हा मूलभूत मानवी हक्क आहे, तरीही जगभरातील लाखो लोकांना या मूलभूत गरजेचा अभाव आहे. पाण्याशी संबंधित रोग, जसे की कॉलरा, अपुरा पाणीपुरवठा आणि स्वच्छता या पायाभूत सुविधांचा अजूनही काही ठिकाणी अभाव आहे. पाण्याचे फार महत्त्व असूनही, लोकसंख्या वाढ, प्रदूषण आणि हवामान बदलामुळे जलस्रोतांवर दबाव वाढत आहे. भूगर्भातील पाण्याचा अतिरेक वापर, औद्योगिक उपक्रमांमधून होणारे प्रदूषण आणि अकार्यक्षम पाणी व्यवस्थापन पद्धती यामुळे पाण्याची टंचाई वाढते. हवामान बदलामुळे पर्जन्यवृष्टीच्या पद्धती बदलून आणि अत्यंत हवामानाच्या घटनांची वारंवारता वाढवून अतिरिक्त धोके निर्माण होतात. या आव्हानांना तोंड देण्यासाठी बहुआयामी दृष्टीकोन आवश्यक आहे. शाश्वत पाणी व्यवस्थापन पद्धती, पाण्याच्या पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक आणि संरक्षण वितरणाला प्रोत्साहन देणारी धोरणे आवश्यक आहेत. आंतरराष्ट्रीय सहकार्य देखील महत्त्वपूर्ण आहे, कारण जलस्रोत अनेकदा राष्ट्रीय सीमा व्यापतात. पाणी हे खरे तर जीवन आहे. जैविक कार्ये टिकवून ठेवण्यासाठी, आर्थिक धोरणांना समर्थन देण्यासाठी, पर्यावरणाला आकार देण्यासाठी आणि सांस्कृतिक आणि आध्यात्मिक पद्धतींना समृद्ध करण्यात त्याची महत्त्वपूर्ण भूमिका त्याचे अतुलनीय महत्त्व अधोरेखित करते. २१व्या शतकातील आव्हानांना तोंड देत असताना, सध्याच्या आणि भावी पिढ्यांच्या कल्याणासाठी जलस्रोतांचा शाश्वत वापर सुनिश्चित करणे अत्यावश्यक आहे. आपल्या ग्रहाचे जीवन म्हणून पाण्याचे सार या अमूल्य संसाधनाचे संरक्षण आणि जतन करण्यासाठी आपल्याला कृती आणि धोरणांचे मार्गदर्शन आवश्यक आहे.


भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांच्या पावन स्मृतीस

## विनम्र अभिवादन


सौ.रजनी संजय कुसळकर
कार्यकारी संपादक


श्री. राजु अण्णा कुसळकर
उपसंपादक


श्री. सिताराम अण्णा कुसळकर
जिल्हा प्रतिनिधी


श्री. किशोर विश्वास पाटील
प्रतिनिधी / छायाचित्रकार


ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी
कायदेशीर सल्लागार

साप्ताहिक प्रजा न्याय, धुळे.

हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय - घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे - ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर - भ्रमणध्वनी - ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार - ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखानाशी मालक/प्रकाशक/संपादक सहकत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)